नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १५५ Issue - 155 | वार सोमवार दि. २१ ऑक्टोबर २०२४ Blow- Monday Date 21 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्याच्या अनेक भागांना पावसाचा फटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : राज्यामध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, कोकण विभागात गेल्या एक ते दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. कोकणामध्ये हवामान बिघडल्यामुळे मच्छिमारी थांबली असून मच्छिमारांना आर्थिक फटका बसला आहे. पश्चिम महाराष्ट्रालाही गेल्याच आठवड्यात मुसळधार पावसाने झोडपल्याने तिथेही भात आणि सोयाबीनचे नुकसान झाले आहे.

### पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती

मुसळधार पावसाने शनिवारी रात्री मराठवाड्यातील ४७ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. पावसामुळे अनेक भागांतील पिके पाण्याखाली गेली. नाशिक जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरण पुन्हा एकदा १०० टक्के भरले असून १८ दरवाजांतून ७३३६ क्युसेक वेगाने गोदावरी नदीपात्रात विसर्ग करण्यात आला. त्यामुळे अनेक भागांतील शेतात पाणी साचल्याने जोमात आलेले पीक पाण्याखाली गेले आहे. शनिवारी रात्री उशिरापर्यंत पाऊस पडल्याने काढलेले सोयाबीन, मका या पिकांचे नुकसान होण्याचीही शक्यता आहे. तसेच कापसाचा रंगही बदलू शकतो. दोन दिवसांच्या सततच्या पावसाने नुकसानीची व्याप्ती लगेच कळणार नाही. पण नुकसान दिसू लागले असल्याचे कृषी उपसंचालक तुकाराम मोटे यांनी सांगितले.

खुलताबाद तालुक्यातील कौटगाव, संजरपूरवाडी, भोकरदन तालुक्यातील वाढोना, गोद्री, परळी वैजनाथ तालुक्यातील सेलू या गावात वीज पडून जनावरे दगावली. काही ठिकाणी भिंत पडल्याने जनावरे जखमी झाल्याचेही वृत्त आहे.



नाशिक येथे शनिवारी रात्री मुसळधार वादळी पावसाने चांदवड, देवळा, पेठ या तालुक्यांसह सिन्नर, नाशिक आणि निफाड भागास चांगलेच झोडपले. एकट्या चांदवड तालुक्यात १६ हजार हेक्टरवरील तर चांदवडमध्ये साडेआठ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. यात कांदा, द्राक्ष, मका, सोयाबीन, भाजीपाला, डाळिंबाचा समावेश आहे. शेकडो घरे आणि दुकानांमध्ये पाणी शिरले. अनेक घरांची पडझड झाली. तसेच नाशिक शहरासह कळवण, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, येवला आदी तालुक्यात अवघ्या काही तासात मुसळधार पाऊस झाला. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी रविवारी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करुन पंचनामे करण्याचे निर्देश दिले. जळगावच्या अमळनेर तालुक्यातही दोन दिवसांपासून सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले.

विदर्भाला अवकाळीचा फटका यवतमाळ, बुलढाणा, अकोला, आणि अमरावती जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. यवतमाळ जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने दाणदाण उडाली. गेल्या २४ तासांत २३.३० मिमी पावसाची नोंद झाली असून, चार मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. बुलढाणा, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांना शनिवारी अवकाळी पावसाने झोडपले. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## भाजपाकडून विधानसभेची पहिली उमेदवार यादी जाहीर



मुंबई : विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची पहिली यादी जाहीर केलेली आहे. या यादीत ९९ जणांचा समावेश आहे. भाजप अनेक विद्यमान आमदारांना नारळ देऊन त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देईल, अशी चर्चा होती. दस्तुरखुद्द केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी तसे संकेत दिले होते. त्यासाठी त्यांनी स्वानुभव सांगितला होता. हरियाणात भाजपनं घाऊक प्रमाणात आमदारांची तिकिटं कापली. त्यामुळे हरियाणा पॅटर्नची चर्चा सुरु झाली. पण प्रत्यक्षात भाजपनं विद्यमान आमदारांवर विश्वास दाखवल्याचं पहिल्या यादीवरुन स्पष्ट होत आहे.

भाजपच्या पहिल्या यादीत ९९ जणांचा समावेश आहे. पक्षानं १३ महिलांना संधी दिली आहे. ७१ आमदारांना पुन्हा एकदा तिकीट दिलेलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंत्री गिरीश महाजन, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, अतुल सावे यांना पुन्हा संधी देण्यात आलेली आहे. मुनगंटीवार यांना चंद्रपुरातून लोकसभेची उमेदवारी देण्यात आलेली होती. पण त्यांचा पराभव झाला. आता पक्षानं त्यांना विधानसभेची उमेदवारी दिली आहे. मुंबईतील १६ पैकी १३ आमदारांना पुन्हा एकदा संधी दिलेली आहे. तीन आमदार अद्याप वेटिंगवर आहेत. त्यांची धाकधूक वाढलेली आहे. भाजपनं तीन आमदारांची तिकिटं कापलेली आहे. चिंचवड, कल्याण पूर्व, श्रीगोंद्याच्या आमदारांना पुन्हा संधी दिलेली नाही. चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, कल्याण पूर्वचे आमदार गणपत गायकवाड, श्रीगोंद्याचे आमदार बबनराव पाचपुते (पान २ वर...)

## थोडक्यात

### सी-व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ६६७ तक्रारी

मुंबई : राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २० ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ६६७ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६६० तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली आहे. सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही पस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या पव्दारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाव्दारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते. राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण २७ कोटी ७८ लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ला; दोन स्थलांतरित कामगारांची गोळ्या झाडून हत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : गेल्या काही महिन्यांपासून जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने दहशतवाही हल्ल्याच्या घटना समोर येत आहे. अनेकदा दहशतवादी आणि भारतीय जवानामध्ये चकमकीच्या घटनाही समोर आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी दहशतवाद्यांनी दोन जवानाचं अपहरण केल्याची घटना घडली होती. यानंतर आता पुन्हा एकदा दहशतवाद्यांनी दोन लोकांवर गोळीबार करत हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील गगनगीर भागात दहशतवाद्यांनी दोन स्थलांतरित नागरिकांवर रविवारी रात्री हल्ला केला. या हल्ल्यात दोन कामगारांना जागीच मृत्यू झाला आहे. तसेच या घटनेत अनेक जण जखमी झाल्याचे वृत्तही समोर येत आहे. दरम्यान, हे दोघेही बोगद्याच्या प्रकल्पात काम करत होते. काम करत असतानाच हा हल्ला झाल्याचं सांगितलं जातं. या घटनेची माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितलं की, जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील गगनगीर भागात रविवारी संध्याकाळी दोन स्थलांतरित कामगारांची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. हा हल्ला एका बांधकाम सुरू असलेल्या बोगद्याजवळ झाला. त्यानंतर सुरक्षा दलांनी हल्ल्याच्या ठिकाणी पोहोचून परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. प्राथमिक अहवालानुसार, हल्ले झालेले कामगार हे मध्य काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यातील गगनीरला सोनमर्गला जोडणाऱ्या झेड मोर बोगद्यावर काम करणाऱ्या बांधकाम टीमचा भाग होते. १८ ऑक्टोबर रोजी शोपियान जिल्ह्यात बिहारमधील एका स्थलांतरित कामगाराची दहशतवाद्यांनी हत्या केली होती. त्या घटनेनंतर आज पुन्हा एकदा दोन स्थलांतरित कामगारांची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेनंतर स्थानिकांना या कामगारांचा गोळ्यांनी छिन्नविच्छिन्न केलेले मृतदेह आढळून आले. त्यानंतर ही माहिती सुरक्षा रक्षकांना देण्यात आली.दरम्यान, या घटनेनंतर लगेचच सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून हल्लेखोरांना लवकरात लवकर पकडता यावे, यासाठी शोध मोहीम राबवली जात आहे. या घटनेवर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शोक व्यक्त केला. ते म्हणाले की,मी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करतो आणि पीडितांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात एका भंगार विक्रेत्याला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर रोजी रात्री हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर या प्रकरणात दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. या घटनेत लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सहभाग असल्याचीही माहिती समोर आली होती. या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांची गुन्हे शाखा करत असून आतापर्यंत १० आरोपींना अटक करण्यात आली आहे.



बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणाचा पोलिसांकडून कसून तपास सुरु आहे. आज मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने एका आरोपीला अटक केली आहे. हा आरोपी मूळचा राजस्थानमधील उदयपूरचा रहिवासी असल्याची माहिती सांगितली जात आहे. या आरोपीने १२ ऑक्टोबर रोजी बाबा सिद्दीकी यांची हत्या करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरवल्याचा आरोप आहे. भगवंत सिंग (३२) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीच नाव असून तो नवी मुंबईत राहत होता. भगवंत सिंग याच्या अटकेनंतर कोठडीत असलेल्या एकूण आरोपींची संख्या १० वर पोहोचली आहे. भगवंत सिंग या आरोपीला पोलिसांनी अटक केल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने २६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, भगवंत सिंगने आरोपींना पुरवलेले शस्त्र कोठून आणले होते? त्याने ते शस्त्रे कसे पुरवले? तो राजस्थानमधून शस्त्रे घेऊन मुंबईत आला होता का? अशा सर्व गोष्टीचा तपास आता पोलिसांकडून करण्यात येणार आहे. दरम्यान, भगवंत सिंग हा भंगार विक्रेत्याचं काम करत होता, अशीही माहिती समोर येत आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

दरम्यान, बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात गोळीबार करणाऱ्यांपैकी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह या दोघांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती. या दोघांना २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून त्यांची चौकशी केली जात आहे.

## रायगड येथे पर्यटकांकडून महिलेची गाडीखाली चिरडून हत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अलिबाग : हॉटेल खोलीच्या भाड्यावरून झालेल्या वादातून पर्यटकांनी एका महिलेची गाडीखाली चिरडून हत्या केल्याची धक्कादायक घटना रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर येथे घडली आहे. ज्योती धामणस्कर असे मृत महिलेचे नाव असून त्यांचा 'होम स्टे'चा व्यवसाय होता. श्रीवर्धन पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड येथील आठ पर्यटक रविवारी रात्री दीडच्या सुमारास हरिहरेश्वरमध्ये दाखल झाले. त्यांनी धामणस्कर यांच्या 'ममता होम स्टे'मध्ये खोलीची विचारणा केली. भाड्याच्या रकमेवरून झालेल्या वादानंतर मद्याधुंद अवस्थेतील पर्यटकांनी धामणस्कर यांना मारहाण केली व पळून गेले. मात्र त्यांच्यापैकी एक जण मागे राहिला व त्याला इतर गावकऱ्यांच्या मदतीने धामणस्कर यांनी पकडून ठेवले. आपल्या साथीदाराला नेण्यासाठी आरोपी पुन्हा घटनास्थळी आले. गावकरी साथीदाराला सोडत नसल्याच्या रागातून त्यांनी धामणस्कर यांना गाडीखाली चिरडले व पसार झाले. जखमी झालेला धामणस्कर यांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी इरप्पा यमनप्पा धोत्रे याला घटनास्थळावरून अटक केली. तर आकाश गावडे, विकी प्रेमसिंग गिल यांनाही अटक झाली असून अन्य आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

### दक्षिण आफ्रिका पुन्हा ठरली चोकर्स | मिळाला नवा विश्वविजेता

## न्यूझीलंडने महिलांचा टी २० वर्ल्ड कप जिंकला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : दक्षिण आफ्रिकेचा संघ पुन्हा एकदा चोकर्स ठरला. कारण दक्षिण आफ्रिकेचा संघ हा महिलांच्या टी २० वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. न्यूझीलंडच्या १५९ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने एकही विकेट न गमावता ५१ धावांची सलामी दिली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिका यावेळी चौकर्स नावाचा शिक्का पुसेल, असे दिसत होते. पण दक्षिण आफ्रिकेने पहिली विकेट गमावली आणि त्यांचा डाव त्यानंतर गडगडला.

न्यूझीलंडने त्यानंतर सामन्यावरील पकड मजबूत केली आणि विजय साकारला. अंतिम फेरीत न्यूझीलंडने ३२ धावांनी दक्षिण आफ्रिकेवर विजय साकारला आणि महिलांचा टी २० वर्ल्ड कप उंचावला.

दक्षिण आफ्रिकेने टॉस जिंकला आणि त्यांनी दुसऱ्याच षटकात न्यूझीलंडला पहिला धक्का दिला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा हा निर्णय योग्य असल्याचे वाटत होते. पण त्यानंतर सुझी बेट्स आणि अमेलिया केर यांची जोडी चांगलीच जमली. सुझीने यावेळी तीन चौकारांच्या जोरावर ३२ धावांची खेळी साकारली. सुझी बाद झाली आणि त्यानंतर काही काळ अमेलियाने चांगला प्रतिकार केला, अती अर्धशतक पूर्ण करण्याच्या समीप आली होती. पण तिचे अर्धशतक हुकले. अमेलियाने चार चौकारांच्या जोरावर ३८ चेंडूंत ४३ धावांची खेळी साकारली. अमेलिया बाद झाली की, न्यूझीलंडचे काय होणार हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. पण या प्रश्नाचे उत्तर न्यूझीलंडच्या एका खेळाडीने दिले.




न्यूझीलंडच्या मदतीला धावून आली ती ब्रुक हॅलिडे. ब्रुकने यावेळी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीचा चांगलाच समचार घेतला. ब्रुकने धडाकेबाज फटकेबाजी केली आणि संघाला शंभर धावांचा पल्ला ओलांडून दिला.

ब्रुकने यावेळी फक्त २८ चेंडूत ३८ धावांची तुफानी खेळी साकारली. त्यामुळेच न्यूझीलंडच्या संघाला दीडशे धावांचा पल्ला गाठता आला. महिलांच्या टी २० क्रिकेटमध्ये १५० धावांचे लक्ष्य आव्हानात्मक समजले जाते आणि तेच यावेळी पाहायला मिळाले. दक्षिण आफ्रिकेच्या संघालाहे आव्हान पेलवले नाही आणि त्यांना पराभव पत्करावा लागला.

दक्षिण आफ्रिकेचा संघ १५९ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानाच उतरला आणि त्यांनी ५१ धावांची सलामीही दिली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा संघ यावेळी चोकरर्सचा शिक्का पुसेल, असे वाटत होते. पण जेव्हा त्यांची पहिली विकेट पडली त्यानंतर त्यांचा डाव उभा राहू शकला नाही. कारण त्यानंतर फक्त २६ धावांत दक्षिण आफ्रिकेने आपला अर्धा संघ गमावला आणि तिथेच त्यांचा पराभव निश्चित झाला.

महिला टी २० वर्ल्ड कपची फायनल यावेळी चांगलीच रंगली. न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका दोन्ही संघांनी तोडीस तोड केला आणि त्यामुळेच चाहत्यांना या फायनलचा मनमुराद आनंद लुटता आला.

## महाविकास आघाडीतील वाद विकोपाला; विदर्भातील १२ जागांवर तडजोडीस काँग्रेस ठाकरे गटाचा नकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा वाद रविवारी विकोपाला गेला. पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी दिल्लीत काँग्रेस आणि मुंबईत शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या नेत्यांना धावधाव करावी लागली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी प्रदेश काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांची तातडीने बैठक बोलावण्यात आली. या घडामोडींमुळे काँग्रेसची केंद्रीय निवडणूक समितीची बैठकही रद्द करावी लागली. महाविकास आघाडीमध्ये १५ जागांचा तिढा सुटलेला नाही. यातील १२ जागा प्रामुख्याने विदर्भातील असून त्यावर तडजोड करण्यास काँग्रेस व ठाकरे गटाने ठाम नकार दिला आहे. मुंबईत शनिवारी महाविकास आघाडीतील तीनही नेत्यांची मॅरेथॉन बैठक होऊनही सहमती होऊ शकली नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांनी रविवारी बैठक घेऊन तुटेपर्यंत ताणू नका असा इशारा एकमेकांना दिला. ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे व अनिल परब यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी करण्यासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर शरद पवार यांनी दिल्लीत काँग्रेसच्या नेत्यांशी फोनवरून संवाद साधल्याचे समजते. या मध्यस्थीनंतर महाविकास आघाडीतील वाद मिटला असल्याने सोमवारी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन जागावाटपाची घोषणा केली जाईल, असे ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांनी सांगितले होते. मात्र, काँग्रेसचे सर्व नेते दिल्लीत असल्याने ही पत्रकार परिषद होण्याची शक्यता नसल्याचे समजते. काँग्रेसच्या सुमारे ६०हून अधिक उमेदवारांची पहिला यादी रविवारी रात्री उशिरा जाहीर होण्याची शक्यता होती. उमेदवारांच्या निश्चितीसाठी दिल्लीमध्ये सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्या उपस्थितीत केंद्रीय निवडणूक समितीची बैठकही आयोजित करण्यात आली होती. मात्र, महाविकास आघाडीतील पेचामुळे ही बैठक रद्द करण्यात आली असून आता सोमवारी ही बैठक होणार असल्याचे समजते. खरगेंच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, वर्षा गायकवाड, सतेज पाटील, सुनील केदार आदी नेते उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज




## संपादकीय....

### शेतकऱ्यांना फटका

विदर्भाला अवकाळीचा फटका यवतमाळ, बुलढाणा, अकोला, आणि अमरावती जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. यवतमाळ जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने दाणदाण उडाली. राज्यामध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, कोकण विभागात गेल्या एक ते दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. कोकणामध्ये हवामान बिघडल्यामुळे मच्छिमारी थांबली असून मच्छिमारांना आर्थिक फटका बसला आहे. पश्चिम महाराष्ट्रालाही गेल्याच आठवड्यात मुसळधार पावसाने झोडपल्याने तिथेही भात आणि सोयाबीनचे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसाने शनिवारी रात्री मराठवाड्यातील ४७ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. पावसामुळे अनेक भागांतील पिके पाण्याखाली गेली. शनिवारी रात्री उशिरापर्यंत पाऊस पडल्याने काढलेले सोयाबीन, मका या पिकांचे नुकसान होण्याचीही शक्यता आहे. तसेच कापसाचा रंगही बदलू शकतो. दोन दिवसांच्या सततच्या पावसाने नुकसानीची व्याप्ती लगेच कळणार नाही. पण नुकसान दिसू लागले. एकट्या चांदवड तालुक्यात १६ हजार हेक्टरवरील तर चांदवडमध्ये साडेआठ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. यात कांदा, द्राक्ष, मका, सोयाबीन, भाजीपाला, डाळिंबाचा समावेश आहे. शेकडो घरे आणि दुकानांमध्ये पाणी शिरले.

# गतकालीन मराठी रंगभूमीचा अनोखा वैभव प्रदीर्घ नाट्य परंपरा : व्यवसायिक क्षेत्रांना हातभार

गोदिंया : महाराष्ट्राच्या प्रदेशाला दीर्घ नाट्य परंपरा लाभली आहे. पहिल्या शतकातील सातवाहन शासक गौतमीपुत्र सातकर्णी यांची आई गौतमी बालश्री यांनी नाशिक येथील गुहेतील शिलालेखांमध्ये नाटकाचा एक प्रारंभिक संदर्भ सापडतो. शिलालेखात त्यांनी आपल्या प्रजेसाठी उत्सव आणि सामाजिक नाट्य मनोरंजनाचे आयोजन केल्याचा उल्लेख आहे. अशाप्रकारे मराठी रंगभूमी निर्माण झाली आणि कलावंतांनी तीचे वैभव वाढविले. हे विसरताच येत नाही.








मराठी भाषेतील लक्ष्मीकल्याणम आणि गंगा-कावेरी संवाद यांसारख्या १७ व्या शतकातील नाटकांचा उल्लेख करणारे स्त्रोत आहेत. मात्र, ही राजदरबारात सादर होणारी नाटके होती.

रामायणातील एका लोकप्रिय अध्यायावर आधारित विष्णुदास भावे यांचे मराठीतील रंगमंचावरील पहिले सार्वजनिक नाटक सीता स्वयंवर (सीतेचे लग्न) होते. १८४३ मध्ये सांगली येथे, सांगलीच्या संस्थानाचा शासक प्रेक्षकांच्या भेटीस आलेले, हे एक प्रायोगिक नाटक होते, जे शेजारच्या कर्नाटक प्रदेशातील यक्षगान नावाच्या लोकनाट्यावर आधारित होते. आपल्या नाटकाच्या यशानंतर त्यांनी रामायणाच्या इतर भागांबद्दल आणखी बरीच नाटके सादर केली. त्यांच्या नाटकांवर शेक्सपिअर आणि पारशी थिएटर्सचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव होता. भावे यांनी नंतर एक टूरिंग थिएटर ग्रुप तयार केला. शतकाच्या उत्तरार्धात मराठी रंगभूमीवर झाशीच्या राणीचे नाटक (१८७०), सवाई माधवरावांचे मृत्यू (१८७१), अफझलखानाच्या मृत्यूचे नाटक (१८७१) आणि मल्हारव महाराज (१८७५) ही उल्लेखनीय नाटके पाहायला मिळाली. १८८० मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांच्या संगीत शाकुंतल या कालिदासाच्या अभिज्ञानकुंतलम् या शास्त्रीय कृतीवर आधारित मराठी रंगमंचाने एक वेगळे रंगभूमीचे रूप धारण केले. त्यांच्या नाट्यसंस्थेच्या यशाने किर्लोस्कर नाट्यमंडळी मराठी रंगभूमीवर व्यावसायिक पुनरावृत्तीचा मार्ग मोकळा झाला आणि त्यानंतर नाटक कंपन्यांची निर्मिती झाली.

मराठी रंगभूमीच्या सुरुवातीच्या काळात कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी आणि अण्णासाहेब किर्लोस्कर या नाटककारांचे वर्चस्व होते, ज्यांनी संगीत नाटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उत्कृष्ट संगीत नाटकांनी मराठी रंगभूमीला सुमारे अर्धशतक समृद्ध केले. अशा नाटकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या संगीत प्रकाराला नाट्यसंगीत म्हणतात. मराठी रंगभूमीच्या याच काळात बाळ गंधर्व, केशवराव भोळे, भाऊराव कोल्हटकर, दीनानाथ मंगेशकर यांसारखे दिग्गज गायक-अभिनेते घडले.

स्वातंत्र्योत्तर काळातील नाटके

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात, काही नाट्य अभ्यासकांनी त्यांच्या नाटकांमध्ये तमाशा आणि दशावतार या पारंपरिक प्रकारांचा समावेश केला आहे. १९७० च्या दशकातील उल्लेखनीय नाटकामध्ये, बशीर मोमीन (कवठेकर) लिखित ऐतिहासिक संगीत नाटक भंगले स्वप्न महाराष्ट्रा आणि वेडात मराठे वीर दौडले सातविजय तेंडुलकरांच्या घाशीराम कोतवाल, विजया मेहता यांच्या बर्टोल्ट ब्रेख्तच्या द गुड वुमन ऑफ सेटझुआनचे मराठी रूपांतर देवाजीने करुणा केली आणि कॉकेशियन यासारख्या नाटकांचा समावेष होतो. यातील काही नाटकांमध्ये तमाशा कलाप्रकारातील वगनाट्य शैलीचा सुद्धा वापर करण्यात आला.

### मराठी रंगभूमी ऐतिहासिक वैभव

**अठराव्या शतकात सुरू झालेली मराठी रंगभूमीवर नाटकांची परंपरा ही आजतागायत टिकवून ठेवली आहे. आजही ती नाटके गाजलेली आहेत. तसाच त्या नाटकांचा वैभव हा दिवसेंदिवस वाढच चालला आहे. हीच खरी वैभवाची व गौरवाची बाब आहे. हे अविस्मरणीय आहे.**

'भंगले स्वप्न महाराष्ट्रा' या नाटकात मराठ्यांनी राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली कशा प्रकारे दिल्लीच्या आक्रमणाला शौर्याने तोंड दिले हे दर्शवले आहे. आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर रंगमंचावर आणलेल्या या नाटकाद्वारे जनतेला 'स्वराज्य रक्षणासाठी नेहमीच संघर्षाची तयारी ठेवली पाहिजे' असे आवाहन केले जायचे. हे नाटक प्रतिकात्मक स्वरूपात, तत्कालीन दिल्ली सरकारने आणीबाणी लादून देशातील लोकशाही आणि संविधानावर केलेल्या आक्रमणाला धैर्याने परतवून लावण्यासाठी जनतेला प्रेरणा देणारे ठरले.

चॉक सर्कल या नाटकाचे अजब न्याय वर्तुलाचा आणि ब्रेख्तच्या थ्रीपेनी ऑपेराचे रूपांतर तीन पैशाचा तमाशा असे करण्यात आले व ते रंगभूमीवर सादर करण्यात आले. मेहता यांनी रुपांतर केले आणि आयोनेस्को विथ चेअर्स . 'तो मी नव्हेच', 'जनता राजा', 'ती फुलराणी' अशी अनेक लोकप्रिय नाटके रंगभूमीवर आली आणि त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली 'वाऱ्यावरची वरात' हे पु.ल. देशपांडे लिखित विनोदी नाटक अजूनही नवीन कलाकार रंगमंचावर सादर करत आहेत.

**व्यवसायांचा जोड आजही**

मराठी रंगभूमीवरील नाटके सादर करताना अनेक साधनांचा उपयोग करावा लागतो. त्यामुळे त्या साधनांच्या व्यवसायीकांना सहभाग करावा लागतो. ढोलकी, नाल, तबला, हार्मोनियम, घुंगरू, आर्गान, ध्वनी प्रक्षेपण, साऊंड, वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा, प्रयोग सहाय्यक, प्रामटर, भाषा तज्ञ, समीक्षक अशा अनेक व्यवसायीकांचा नाटकाला जोड असतोच.

मराठी रंगभूमी ही परंपरागत चालत आलेली कलावंत निर्माण करणारी जननी आहे. रंगभूमीने अनेकांना मायचा आधार देऊन पोटाचा प्रश्न सोडवत नाव लौकिक करता आले, व्यवसायीकांनाही उपजिवीका करण्याचे माध्यम मिळाले. त्यामुळे मराठी रंगभूमी हीचे वैभव कलाकारांनी जपावे असे माझे प्रामाणिक मत आहे.

– **प्रा. मुन्नाभाई नंदागवळी** (कवी, कलावंत व नाट्य समीक्षक) येरंडी-बाराभाटी

# एस्सी, एसटी,ओबिसी, भटक्या व अल्पसंख्याकांच्या हक्कासाठी प्रकाश आंबेडकर यांची जाहीर सभा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : शासनाच्या आरक्षण विरोध कार्यप्रणालीला आळा घालण्यासाठी गल्ली ते दिल्ली अशा नागरिकांनी अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती तसेच अन्य प्रवर्गातील भारतातील नागरिकांनी उपवर्गीकरण होऊ नये यासाठी अर्जुनीमोरगाव विधानसभा वंचित बहुजन आघाडी या पक्षांतर्गत अड. बाळासाहेब आंबेडकर राष्ट्रीय अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

सदर सभा दिनांक २२-१०-२०२४ ला दुपारी १२.०० वाजता, अर्जुनीमोरगाव विधानसभा क्षेत्रातील सडक अर्जुनी, ग्रामीण रुग्णालय समोर शेंडा रोड याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. यासाठी वंचित बहुजन आघाडी पक्षाचे जाहीर करण्यात आलेले उमेदवार दिनेश रामरतनजी पंच भाई यांनी आयोजन केले आहे. यासाठी अर्जुनीमोरगाव विधानसभा क्षेत्र ६३ मधील सर्व मतदार नागरिकांना वंचित बहुजन आघाडी तसेच युवा वंचित बहुजन आघाडी या संघटनां परिश्रम घेत आहेत. याप्रसंगी प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे यांचा संगितमय कार्यक्रम सादर होणार आहे. एस सी, एस टी, ओबीसी, भटक्या विमुक्त व अल्पसंख्याक समाजातील तमाम नागरिकांनी या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन युवा वंचित बहुजन आघाडी अर्जुनीमोरगाव तालुकाध कैलास ईस्कापे, सामाजिक कार्यकर्ते दिपक तागडे, कृपाल बोरकर, सुरज रंगारी, रोहित रामटेके, संदीप नंदागवळी, विशाल गेडाम, संदीप पंधरे, कमलेश ब्राम्हणकर, गुलाब वाघाडे, सुभाष वाघाडे, आदींनी केली आहे.

## भाजपाकडून विधानसभेची पहिली उमेदवार यादी जाहीर

(पान १ वरून..) यांची तिकिटं कापलेली आहेत. भाजपनं ३ आमदारांची तिकिटं कापताना त्या आमदारांच्या जागी त्यांच्या घरातील सदस्यांनाच संधी दिली आहे. जगताप यांचे दीर शंकर जगताप, गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड, पाचपुते यांच्या पत्नी प्रतिभा यांना संधी देण्यात आलेली आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपनं अशाच प्रकारे अकोला, बीडमध्ये विद्यमान खासदारांचं तिकीट कापून त्यांच्या कुटुंबातच उमेदवारी दिली होती.

२०१९ मध्ये भाजपनं लोकसभेच्या २५ जागा लढवल्या होत्या. २०२४ मध्ये या २५ पैकी १५ जागांवर विद्यमान खासदारांनाच संधी दिली. त्यांच्या विरोधात असलेल्या वातावरणाचा फटका भाजपला बसला. लोकसभेला राबवण्यात आलेला पॅटर्न आता विधानसभेला पुन्हा राबवण्यात येत आहे. विद्यमानांना संधी देण्याची भाजपची खेळी लोकसभेला फेल ठरली होती. आता तीच खेळी भाजपनं पुन्हा केली आहे. आता त्याचे परिणाम कसे होणार, याचं उत्तर २३ नोव्हेंबरला मिळेल.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी घेतली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : रिपब्लीकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास आठवले यांनी आज भाजप चे राज्यातील प्रमूख नेते उपमुख्यमंत्री ना.श्री देवेंद्र फडणवीस यांची आज सागर बंगल्यावर भेट घेऊन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाला काही जागा सोडण्याबाबत चर्चा केली.यावेळी राज्यभरातील चर्चेला दिलेल्या १० ते१२ जागांपैकी ५ ते ६ जागा रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात याव्यात अशी आग्रही मागणी ना.रामदास आठवले यांनी उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली यावेळी झालेल्या चर्चेत रिपब्लिकन पक्षाला निश्चित जागा सोडणे आवश्यक असून त्याबाबत आज महायुती च्या तीन मोठ्या पक्षांसोबत



च्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन उपमख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ना. रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाला दिले.

यावेळी ना. रामदास आठवलेंच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटलेल्या रिपब्लीकन पक्षाच्या शिष्टंडळात राष्ट्रिय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; राज्य युवक आघाडी अध्यक्ष पप्पू कागदे; एम एस नंदा; महेंद्र मानकर; हेमंत रणपिसे; प्रवीण मोरे; सचिन बनसोडे उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्षाला महाराष्ट्रात केज जिल्हा बीड येथे पप्पू कागदे ; यवतमाळ मधील उमरखेड. विधानसभा मतदारसंघात महेंद्र मानकर; त्यानंतर धारावी ; चेंबूर; श्रीरामपूर ; पिंपरी; उत्तर नागपुर; देगळूर या ७ जागांवर रिपब्लिकन पक्षाने दावा केला असून यातील किमान ५ जागा रिपब्लिकन पक्षाला सुटतील अशी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चे नंतर रिपब्लिकन पक्षाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

**रिपब्लिकन पक्षाला किमान ५ जागा तरी मिळणार**

महायुती चे पुन्हा सरकार आल्यावर रिपब्लिकन पक्षाला एक कॅबिनेट मंत्री पद द्यावे; एक एम एल सी विधानपरिषद सदस्यत्व द्यावे; ३ महामंडळ चे अध्यक्ष पद; ३ उपाध्यक्षपदे द्यावीत; सर्व महामंडळाचे सदस्यत्व द्यावे तसेच जिल्हा परिषद पंचायत समिती आणि महानगर पालिका निवडणुकांत रिपब्लिकन पक्षाला जागा सोडाव्यात अशा विविध मागण्या रिपब्लिकन पक्षातर्फे देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदन देऊन करण्यात आल्याची माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली.

सर्व मागासवर्गीय महामंडळाचे कर्ज माफ करावे; गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्यासाठी १४ एप्रिल १९९० च्या मुदतीत वाढ करून १४ एप्रिल २०१४ पर्यन्त पात्रता निश्चित करावी तसेच एस आर ए योजनेत मिळणारी घरे छोटी असून ४५० चौ.फुटांचे घर झोपडीवासियांना देण्यात यावे या मागण्यांचा महायुती सरकार ने पुन्हा सत्तेत येण्यासाठी विचार करावा अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी केली.

# पिढ्यापिढ्यांचे संचित जतन करणारे अमूल्य लिखाण : डॉ. नितीन पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : ( प्रतिनीधी ) : पशुवैद्यक विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता असलेले, डॉ.पुरुषोत्तम कुळकर्णी यांच्या 'पाऊलखुणा' या मराठी पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद 'फुट प्रिंट्स ऑन सँडस ऑफ टाइम' चे प्रकाशन १९ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते शुभमंगल कार्यालय येथे पार पडले. विशेष अतिथी व भाष्यकार म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री व लेखिका मनीषा अतुल उपस्थित होत्या.

या प्रसंगी बोलतांना डॉ. नितीन पाटील म्हणाले, डॉ.कुळकर्णी यांचे पुस्तक म्हणजे पशुवैद्यक शास्त्रज्ञांना मार्गदर्शनपर ठरणारे महत्वाचे लिखाण आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि संशोधनाचा फायदा पशुवैद्यक क्षेत्रातील जागतिक समस्यांच्या निराकरणासाठी निश्चितच करून घेता येईल. तसेच ग्रंथावर भाष्य करताना मनीषा अतुल यांनी हे एक महत्वाचे आत्मचरित्र असल्याचे सांगितले. वाचकांना अज्ञात असलेल्या पशुवैद्यकशास्त्रातल्या एका निराळ्या अनुभवविश्वाचा प्रत्यय आणि भारताच्या गेल्या दीडशे वर्षांच्या परिवर्तनाचा तपशील, त्यांच्या या आत्मचरित्रपर पुस्तकातून मांडल्या गेला आहे असे त्या म्हणाल्या.

**पुरुषोत्तम कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**

या प्रसंगी पुस्तकाचे अनुवादक श्री आप्पासाहेब चापोरकर यांनी डॉ. कुलकर्णी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडून दाखविले. ते म्हणाले हा ग्रंथ म्हणजे भारतीय संस्कृतीचे मूल्यसंवर्धन करण्याकरिता अनेक पिढ्यांना दिशा देणारा दिपस्तंभ आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुनील कुलकर्णी व डॉ. शिरीष उपाध्ये, अधिष्ठाता, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी केले. तर आभारप्रदर्शन अचला कुलकर्णी यांनी केले. या प्रसंगी सोहळ्यात अनेक क्षेत्रातील मान्यवर डॉ. दांडगे, माजी कुलसचिव आणि अधिष्ठाता, डॉ. मारूडवार, डॉ. ढकाते, डॉ. गहलोद व कुलकर्णी परिवारातील सदस्य उपास्थित होते.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सिव्हिल हॉस्पिटल मधून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : सिव्हिल हॉस्पिटल येथील ए ब्लॉकच्या पार्किंग मध्ये पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.सीझेड.९१५३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १३ ऑक्टोबर रोजी घडली. याप्रकरणी आरिफ शुकूर इनामदार (वय-४२, रा.रामवाडी,भूषण नगर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सरतापे हे करीत आहेत.

### पैशासाठी पत्नीचा छळ करून बेदम मारहाण; पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नीला पतीसह सासरकडच्या मंडळींनी शारीरिक व मानसिक त्रास देऊन नोकरीस लावण्याकरिता माहेरून पैशाची मागणी करीत दुसरे लग्न करण्याची व घटस्फोटची मागणी करून क्रूर वागणूक देऊन बेदम मारहाण केल्याची फिर्याद अमिना हैदर पाशा (वय-२६-,रा.दक्षिण सदर बझार,केशवनगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती हैदर, सासू नसीम बेगम, नणंद रहिमाबेगम,दिर खलील,अल्ली व जलील (सर्व.रा.कारवा साहू,हैदराबाद तेलंगणा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना दि.१३ सप्टेंबर २०१६ ते ३० एप्रिल २०२४ पर्यंत दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : वृद्धाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका दुचाकी चालकाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना १५ ऑक्टोंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास शिवशक्ती रिक्षा स्टॅन्ड फ्लोरा गॅलेक्सी अपार्टमेंट येथील सार्वजनिक रस्त्यावर घडली. याप्रकरणी संदीप प्रकाश सलगर (वय-३८,रा.राजेश कुमार नगर होटगी रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून एमएच.१३. एएम.बीयु.२०१८ यावरील चालक आयान महबूब संगत्राश (रा.रोहिणी नगर भाग २) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचे वडील प्रकाश लक्ष्मण सलगर (वय-६२,रा.उत्कर्ष नगर,जुळे सोलापूर) हे दुचाकी क्रमांक एमएच.१३.एम एच.५५५९ वरून घराकडे येत असताना फारूक मौलाअली यांच्या मालकीची दुचाकी ही वरील संशयित आरोपी याने निष्काळजीपणाने चालून फिर्यादी यांच्या वडिलांना धडक देऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे व गाडीचे नुकसान केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोसई.पोपळघट हे करीत आहे.

# साधूसंतांचा व देवीदेवतांचा अपमान करणाऱ्या पक्षाला मतदान करणार नाही

## वारकरी संप्रदायाचा ठराव; अकोले येथे वारकरी धर्म परिषद




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी : साधूसंतांचा व देवीदेवतांचा अपमान करणाऱ्या पक्षाला मतदान करणार नाही अन हिंदू समाजाने पण करू नये यासाठी जनजागृती करण्याचा ठराव वारकरी धर्म परिषद मध्ये एकमताने मंजूर करण्यात आला.

अकोले येथील अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट च्या वतीने वारकरी धर्म परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी पहिल्या सत्रात महामंडलेश्वर रामकृष्ण महाराज लहवितकर व दुसऱ्या सत्रात संत तुकाराम महाराज संस्थान नेवासा चे मठाधीपती उद्धव महाराज मंडलिक होते. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे प्रांत मंत्री माधवदास महाराज राठी, आमदार डॉ. किरण लहामटे, धर्मवीर अध्यात्मिक वारकरी आघाडी चे अध्यक्ष अक्षय महाराज भोसले, अगस्ती देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष अड. के.डी. धुमाळ आदी उपस्थित होते.

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी आपली संस्कृती जपण्याचे काम वारकरी करित असून हिंदू धर्मावर येणारे अनेक संकट येत आहे. राष्ट्र उभारणी साठी कार्य करण्याची जबाबदारी वारकरी पंथावर आहे. असे मत व्यक्त केले.

उद्धव महाराज मंडलिक यांनी वारकरी संप्रदाया ला कोणी शिकवण्याची आवश्यकता नाही. वारकरी हा संस्कृतीने समृद्ध आहे. असे मत व्यक्त केले.

शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांनी राजसत्ता व धर्मसत्ता यांचा अनुबंध या सत्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अध्यात्मिक क्षेत्रासाठी केलल्या कामाबद्दल व त्यांच्या नेतृत्वातील सकल योजना यांची विशेष माहिती दिली. घराघरापर्यंत पोहचून १००% मतदान होईल त्यासाठी प्रयत्न करण्याबाबत उपस्थितांना विनंती केली.

रामनाथ महाराज जाधव यांनी तालुक्यात रावण संघटना वाढीस लागल्या ची खंत व्यक्त केली. दत्ता महाराज भोर यांनी जे पक्ष धर्माला मानत नाही अस्या पक्षाच्या अध्यात्मिक आघाडी च्या पदासाठी वारकरी जातात ही खेदाची बाब असल्याचे म्हटले. गोविंद महाराज करंजकर यांनी वारकरी संप्रदाया मध्ये फुट पाडण्याची क्रिया राबवली जात आहे अस मत व्यक्त केले.

महामंडलेश्वर बाळनाथ महाराज सरस्वती यांनी आपण माणसे पेरणे आवश्यक आहे. अधर्म कमी करायचा असेल तर संघटन महत्वाचे आहे. रावण संघटनेच्या मागे कोण आहे याचा शोध घेतला पाहिजे. असे मत व्यक्त केले.

इस्लाम, इसाई सारख्या अनेक समस्या आहेत. मात्र आदिवासी समाजामध्ये आपण जातो का? पुराण कथा न सांगता आजची सद्य स्थिती वर बोललं पाहिजे. वारकऱ्यांनी महिन्यातून एकदा तरी एकत्र यावेत. हृदयातील देव तोडण्याची प्रक्रिया राबविली जाते. असे मत रमेश महाराज क्षीरसागर यांनी व्यक्त केले. देशाचे अनेक शिक्षण मंत्री मुस्लिम असल्याने हिंदू समाज शिक्षण शिकवले नाही. लव्ह जिहाद मुळे महिला संकटात असून हिंदूची लोकसंख्या कमी होत असून मुस्लिम ची वाढत आहे. तीन राज्यात हिंदू अल्पसंख्यांक झाले आहे. लँड जिहाद च्या माध्यमातून वक्फ बोर्ड आज जमीन गिळंकृत करीत आहे. आज हिंदू ना काही व्यवसाय करण्याची लाज वाटत आहे ते व्यवसाय दुसऱ्या धर्माकडे जाईल. व्होट जिहाद मधून हिंदुत्ववादी विचारांना पराभूत करण्याचा मानस केला जातो. विश्व हिंदू परिषदे चे अनिरुद्ध पंडित यांनी विचार मांडले.

महानुभव पंथाचे विजयराज बाबा म्हणाले की, आम्हाला परकीया कडून भीती नाही खरी भीती आमच्यातील गद्दारांची आहे. आपली खरेदी भाई कडून करा, भाईजान कडून नको. धर्मासाठी अधर्म सुद्धा करावा लागतो. धर्मनिरपेक्षता मुळे आम्ही आमचा धर्म विसरलो. सप्ताह मध्ये आपण हिंदुत्वाचा विचार मांडला पाहिजे. असे मत व्यक्त केले

राजकीय स्वार्थाने बरबटलेल्या ना धडा शिकविण्यासाठी शस्त्र हाती घेतले पाहिजे. संत रूपाने आपण जन्म घेतला असून आपण हे कार्य केले पाहिजे. घरवापसी झाली पाहिजे. अगस्ती ऋषी चे गाढे अभ्यासक अनिल सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले. एकनाथ महाराज भांगरे यांनी वारकरी धर्म परिषद आदिवासी भागात प्रवरा नदीच्या उगमस्थांनी अमृतेश्वर येथे व्हावा विनंती केली.

यावेळी देवराम महाराज इदे, सुदाम महाराज कोकणे, प्रदीप भाटे, मावळा संघटनेचे गणेश हुळवले, बाळकृष्ण महाराज कर्पे, पूजाताई पोखरकर यांनी यावेळी मते व्यक्त केली.

प्रास्तविक श्री.माधवदास महाराज राठी यांनी तर आभार राजेंद्र महाराज नवले यांनी मानले. अकोले तालुक्यात कोंडार महाराज यांचे आश्रमात धर्म परिषद तसेच महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसूबाई च्या पायथ्याशी अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपक महाराज देशमुख, राजेंद्र महाराज नवले, चंद्रकांत महाराज चौधरी, सुनील महाराज मंगळापुरकर व्यंकटेश महाराज सोनवणे, संदीप महाराज सावंत, राजेंद्र महाराज सदगीर, गणेश महाराज वाकचौरे, अरुण महाराज शिर्के, विवेक महाराज केदार, किशोर महाराज धुमाळ, संकेत महाराज आरोटे, रामनाथ मुतडक, नितीन महाराज गोडसे यांनी विशेष प्रयत्न केले.

> हिंदू धर्मासाठी काम करणाऱ्याना निवडून दिले पाहिजे यासाठी वारकरी संप्रदायाने ताकाला जाऊन गाडगे लपविण्याचे आता बंद करा.
>
> **–महामंडलेश्वर द्वाराचार्य रामकृष्णदास लहवितकर महाराज**

> आदिवासी भागात सप्ताह बंद पाडण्याचं काम होत होते त्यामुळे तालुक्यात रावण संघटने च्या विस्ताराला रोख लावला असून ख्रिश्चन मिशनरी ना पायबंद घातला आहे.
>
> **–आमदार डॉ. किरण लहामटे**

> कपाळा ला टिळा लावणारा पहिले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असून दिंडया ना मदत करणारे आहेत.
>
> **– अक्षय महाराज भोसले**

# मी आंबेडकरवादी सामाजिक संघटनेचा विद्यमान आमदार दत्तामामा भरणे यांना बिनशर्त पाठिंबा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


इंदापूर/प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : मी आंबेडकरवादी सामाजिक संघटनेने या विधानसभेच्या निवडणुकीत विद्यमान आमदार दत्तामामा भरणे यांना बिनशर्त पाठिंबा रविवार दि. २० ऑक्टोबर २०२४ रोजी भरणेवाडी येथील आमदारांच्या निवासस्थानी दिला. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या वनसाळे , संघटनेचे सचिव अनिल केंगार, राजशिष्टाचार समितीचे आप्पासो कदम, नागेश भोसले,मिलिंद भोसले, तालुका अध्यक्ष सतीश वाघमारे, समाधान भोसले, अशोक मिसाळ , बबलू वंचाळे हे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

इंदापुर तालुक्याच्या ८० गावात संघटनेचे जाळे असुन संघटनेला मानणारे कार्यकर्ते आहेत. संघटनेकडे निर्णायक मते असुन त्याचा फायदा दत्तात्रय भरणे यांना होणार आहे.

विद्यमान आमदारांनी तालुक्यात अनेक गावांमध्ये बुध्दविहार बांधण्यासाठी निधी, बुध्दविहार सुशोभीकरणासाठी निधी, अनेक दलित वस्त्यांमध्ये सामाजिक सभागृहांना निधी, अभ्यासिकांसाठी निधी, दलित वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्त्यांसाठी निधी, बंदिस्त गटार योजनांसाठी निधी,बौद्ध विहारांच्या स्वागत कमानीसाठी निधी, प्रकाश व्यवस्थेसाठी निधी,लासुर्णे येथे भव्य संविधान भवन बांधण्यासाठी भरघोस ३ कोटींचा निधी दिला आहे. म्हणूनच संघटनेने बिनशर्त पाठिंबा दिला असून संघटनेचे प्रमुख पदाधिकारी सर्व इंदापूर तालुक्यात गावभेट दौरा करणार असुन जास्तीत जास्त मतदान दत्तात्रय भरणे यांना देण्यासाठी मतदारांना विनंती करणार आहेत.

# लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत तीर्थक्षेत्र विकास आराखडा वर्ग क मध्ये समाविष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब तसेच सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य श्री. महेश (नाना) साठे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख लोकसभा यांच्या आशीर्वादाने तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री सन्माननीय चंद्रकांत दादा पाटील यांच्या आशीर्वादाने वेळेस लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत तीर्थक्षेत्र विकास आराखडा वर्ग क मध्ये समाविष्ट एवढा भरघोस निधि वरील सर्व सन्माननीय नेते मंडळींचे सरपंच संजय देविदास साठी व टाकळी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने समाधान व्यक्त केले आहे

## बिदरमधील राष्ट्रीय दर्जाच्या परिषदेमध्ये ११ विद्यार्थ्यांना पारितोषिके नावलौकिकात भर

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी फडकाविला कर्नाटकात झेंडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/गोपाळपूर (ता. पंढरपूर) : मधील 'स्वेरी' ही संस्था उत्तम शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याच्या दृष्टीने त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे सातत्याने लक्ष देत असते. तंत्रशिक्षणाच्या अभ्याससंबंधी इंडस्ट्रीयल व्हिजीट असो अथवा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परिषदा असो, यासाठी स्वेरीकडून राज्य व देशाबाहेर जाण्यासाठी विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी व प्राध्यापकांना विशेष सवलती दिल्या जातात. याचा फायदा प्राध्यापक व विद्यार्थी नियमित घेत आहेत हे दिसून येत आहे. अशा होतकरू विद्यार्थ्यांसाठी अनेक हितावह असे धाडसी निर्णय 'स्वेरी' घेत असल्यामुळे अल्पावधीतच स्वेरीने शैक्षणिक क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक विश्वात तर 'स्वेरी'चे नाव आहेच पण आता स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटकात जावून आपल्या स्वेरीच्या शिक्षण संस्कृतीची मोहोर तेथे उमटवली, याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बिदर (कर्नाटक) मधील गुरुनानक देव इंजिनिअरींग कॉलेजमध्ये दि. २७ व दि.२८ सप्टेंबर, २०२४ रोजी 'संस्टेनेबल इन्फ्रास्ट्रक्चर अँड इनोव्हेशन इन सिव्हील इंजिनिअरींग' या विषयावर आयोजिलेल्या राष्ट्रीय दर्जाच्या परिषदेमध्ये 'शोध प्रकल्प' स्पर्धेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या तब्बल ११ विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली. त्यामुळे राज्याबरोबरच आता राज्याबाहेर देखील स्वेरी चा झेंडा डौलाने फडकविला गेला आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व इंजिनिअरींग कॉलेजचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सिव्हील इंजिनिअरींग विभागातील डॉ. माणिक देशमुख व प्रा. चेतन लिमकर यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले. सदरच्या राष्ट्रीय दर्जाच्या परिषदेमध्ये स्वेरीच्या एकूण ४५ विद्यार्थ्यांनी १६ शोध पेपर सादर केले. त्यातून सायली विजय अस्टुळ, नम्रता दिनकर चवरे, आकांक्षा जगन्नाथ माने व प्रियांका प्रताप कारंडे यांनी 'परफॉर्म्स इव्हाल्युएशन ऑफ मॉर्टर मिक्सेस' या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. अस्मिता हनुमंत मोरे, श्वेता रवी कोकणे, पूजा संतोष ढेरे व स्मिता धनाजी देशमुख यांनी डेव्हलपमेंट ऑफ पर्विअस कॉन्क्रेट पेवर ब्लॉक्स फॉर बिल्डींग' या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक मिळविला तसेच महेश लक्ष्मण पडवळे, यश सतीश निंबाळकर व संकेत चंद्रकांत लेंडवे यांनी 'प्रिसिजन एलिव्हेशन मॅपिंग थ्रू ड्रोन इंटीग्रेशन' यामध्ये तृतीय क्रमांक पटकाविला. चुरशीच्या पेपर स्पर्धेत स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारल्यामुळे गुरुनानक देव इंजिनिअरींग कॉलेज संस्थेचे चेअरमन सरदार बलबीर सिंग, संस्थेच्या व्हाईस चेअरपर्सन श्रीमती रेश्मा कौर व तेथील प्राचार्य डॉ. सुरेश रेड्डी, उपप्राचार्य डॉ. एम. धनंजय, अधिष्ठाता डॉ. सिंधु प्रसाद, विभागप्रमुख प्रा. उमाशंकर यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देवून गौरविण्यात आले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विभागप्रमुख डॉ. सोनाली पाटील, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर तीनही महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी पेपर प्रेझेन्टेशन मध्ये यश मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# इंदापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष दादासाहेब सोनवणे यांचा वाढदिवस श्रावणबाळ अनाथ आश्रम येथे उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : इंदापूर नगरपरिषदेचे मा.नगरसेवक व इंदापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष श्री.दादासाहेब सोनवणे यांचा वाढदिवसानिमित्त मा.प्रदीपदादा गारटकर मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने इंदापूर येथील श्रावणबाळ अनाथ आश्रम श्रीराम मंदिर येथे मुला-मुलींना मिठाई वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.तसेच इंदापूर येथील शासकिय रुग्णालय येथे सर्व रुग्णांना फळे वाटप करण्यात आले व इंदापूर येथील जोतीबामाळ येथील स्मशानभूमी येथे रुक्षारोपन करण्यात आले.

यावेळी इंदापूर नगरपरिषदेचे मा.नगराध्यक्ष मा.विठ्ठल (आप्पा) ननवरे, मा.उपनगराध्यक्ष मा.राजेश शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष या.अनिल राऊत, आर. पि.आय इंदापूर तालुका अध्यक्ष मा.बाळासाहेब सरवदे,मा.नगरसेवक.मा. सुधीर मखरे, प्रा.अशोक मखरे (सर), डॉ.खाडे सर, डॉ.विनोद राजपुरे (सर), प्रा.डॉ.अमोल ऊणाळे (सर), अल्पसंख्याक इंदापूर शहर अध्यक्ष मा.अहमदरज्जा सय्यद, मा.धरमचंद लोढा (पप्पा) मा.बाळासाहेब क्षिरसागर, मा.बाळासाहेब आडसुळ, मा.राजाभाऊ गुळीक, मा.चंदु सोनवणे, मा.मुकिंद शिंदे, मा.अनिल चव्हाण, मा.शिवाजी मखरे (अंकल) मा.सुनिल यादव, मा.समिर दुधनकर, मिलन सोनवणे, अजय सोनवणे, समिर सोनवणे, ऋषी ढावरे, तुषार ढावरे, दिग्विजय सोनवणे, सागर सोनवणे, सुमित आरडे, रितेश बंडलकर इत्यादी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून तरुणाच्या डोक्यात घातला हवा भरण्याचा पाईप; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून तरुणाच्या डोक्यात हवा भरण्याचा लोखंडी पाईप मारून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत धमकी दिल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना १८ ऑक्टोंबर रोजी आंबेडकर चौक येथे घडली. याप्रकरणी योगेश्वर राजू शिंदे (वय-२०,रा.शुक्रवार पेठ,समाचार चौक) याने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून जयेश बहुरुणगी (रा.शिवाजी सोसायटी आंबेडकर चौक), आर्यन गोसावी व इतर दोन अज्ञात मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की,फिर्यादी व फिर्यादी याची मैत्रीण असे मिळून जयेश याला समजावून सांगण्याकरिता त्याच्या घरी गेले होते. त्यावेळी फिर्यादी योगेश्वर शिंदे याला तु मैत्रिणीला कशाला घेऊन आला, तुझा काय संबंध असे म्हणत फिर्यादीला फायबरच्या पाईपने डोक्यात मारले व त्यानंतर आर्यन गोसावी याने हवा भरण्याचा लोखंडी पाईप डोक्यात मारून फिर्यादीस जखमी केले. तर अज्ञात दोन इसमांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून तु माझ्या घरापर्यंत आला.तुला जिवंत सोडणार नाही. असे म्हणत धमकी दिली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गावडे हे करीत आहेत.

### चोरट्याने खिशातील मोबाईलसह रक्कम पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात चोरट्याने फिर्यादी राजेंद्र बाबुराव कुर्ले (वय-५३,रा.मु.पो.मुस्ती) यांच्या खिशातील दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल व दहा हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना १६ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास मित्र नगर शेळगी येथे घडली. याप्रकरणी राजेंद्र कुर्ले यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आरेनवरू हे करीत आहेत.

# गौणखनिज चोरी विरुद्ध कारवाई होणार गतिमान

## संयुक्त मासिक सभेसाठी राज्य प्रशासन सकारात्मक ; वाळू धोरणावरील आदेशाचे गांभिर्याने पालन गरजेचे

**अवैद्य गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर कायमस्वरूपी प्रतिबंध घालण्या साठी प्रभावी उपाययोजना म्हणून जबाबदारी निश्चित असलेल्या महसूल परिवहन व पोलीस विभागाची संयुक्त मासिक आढावा सभा घेण्यासंदर्भात जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्याशी संपर्क केला असता, शासनाच्या प्रत्येक आदेशाला गांभीर्याने घेऊन संबंधित विभागाच्या बैठकी घेण्यात येतात हा रुटीन आहे. अवैध वाळू प्रतिबंधक कारवाईच्या संदर्भात बुलढाणा जिल्ह्याचा अहवाल २ ऑगस्ट २०२४ रोजी शासनाकडे सादर करण्यात आला आहे. वाळू धोरणावर संयुक्त बैठकीच्या आदेशाचे ही तेवढ्यात गांभीर्याने पालन करण्यात येईल.**

**– जिल्हाधिकारी किरण पाटील**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/राहुल साबळे : राज्यभरात गौण खनिज चोरी वर निर्बंध घालण्याच्या दृष्टीने जबाबदारी निश्चित असलेल्या महसूल विभाग,पोलीस आणि परिवहनविभागाची संयुक्त मासिक सभा प्रत्येक जिल्ह्यात त्या त्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी शासनाकडे केली होती, या अनुषंगाने नुकतेच विभागाचे राज्य अवर सचिव शिवाजी चौरे यांनी संबंधित विभागाला संयुक्त मासिक सभेबद्दल चे निर्देश जारी केले असून न्यायमूर्ती तथा लोक आयुक्त व्हि.एम कानडे यांच्या आदेशानंतर राज्यभर गौण खनिज चोरी विरुद्ध कारवाई गतिमान होण्या संदर्भात हालचाली प्रशासकीय स्तरावर सुरू झाले आहे.

अवैद्य गौण खनिज उत्खनन व वाहतूकी वर प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासकीय स्तरावर अधिकाऱ्यांमध्ये समन्वय असावा तसेच शासनाचा महसूल वाढावा म्हणून संबंधित शासकीय विभागांची संयुक्त मासिक सभा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी म्हणून महाराष्ट्र राज्य युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. गौण खनिज आणि विशेषतः वाळू चे अवैध उत्खनन व वाहतूकी वर नियंत्रण ठेवण्यासाठी जबाबदारी निश्चित असलेल्या महसूल परिवहन व पोलीस विभागात समन्वय नसल्याने राज्यभर वाळू माफिया मार्फत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात धुमाकूळ घातल्या जात आहे. वाळू माफियाची शिरजुरी वर कायमस्वरूपी प्रतिबंध घालून शासनाचा महसूल कसा वाढेल यासाठी प्रशासनामध्ये समन्वय राहण्याच्या दृष्टीने त्यांची मासिक संयुक्त सभा घेण्याचे निर्देश शासनाने द्यावे अशी मागणी श्री खरात यांनी महसूल विभागाच्या राज्य अप्पर मुख्य सचिव आणि मुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली होती. त्यांच्या या निवेदनाची शासनाने दखल घेतली असून राज्यातील सर्व कक्ष अधिकारी,जिल्हाधिकारी यांनासंबंधित अवर सचिव यांनी एका आदेशाद्वारे महसूल पोलीस व गृह विभागाची संयुक्त बैठक दरमहा घेण्यात यावी असे निर्देश दिले आहे. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या नावाचा संदर्भ देत नमूद करण्यात आले आहे की राज्यभर वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होणार नाही यासाठी संबंधित विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी यांनी कारवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

यामध्ये प्रत्येक वाळू गटामध्ये वाळू वाहतुकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा, वाळू गटामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी बाबतची वरील मानके काटेकोरपणे पाळली जात आहे किंवा कसे याची खात्री वेळोवेळी करावी, असे विशेष निर्देश राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. राज्यभरात होणारा अवैध वाळू उत्खनन व वाहतुकी च्या धुमाकुळीला जरब बसविण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी शासनाचे नियमाचे काटेकोरपणे पालन केल्यास अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर कायमस्वरूपी प्रतिबंध घातल्या जाऊ शकते.मात्र शासनाच्या या आदेशाला जिल्हाधिकारी यांच्याकडून तेवढ्याच गांभीर्याने बघितले जाते का यावर अवर सचिव यांच्या आदेशाचे सर्वव्यापी अवलंबून आहे.

# मुक्तिभूमी, दीक्षाभूमी, चैत्यभूमीतुन घरी जातांना अनुयायी डोक्यावर ग्रंथ घेऊन जातात : प्रा.जयश्री खरे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

येवला (प्रतिनिधी) : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची ऐतिहासिक प्रेरणास्थळे ही क्रांतीचे केंद्र असून लाखो अनुयायी बाबासाहेबांच्या क्रांतिकार्याने चैत्यमान झालेल्या क्षेत्रातून ठिकाणाहून कोट्यावधी रुपयाचे ग्रंथ सातत्याने खरेदी करतात व त्याचे वाचन करून महापुरुषांच्या विचाराचे आचरण करण्याचा प्रयत्न करतात असे मत जयश्री खरे यांनी काढले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तन प्रबोधन व सुधारणावादी लढे ज्या ज्या ठिकाणी लढले ते महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, येवल्याच्या ऐतिहासिक मुक्तिभूमी, धम्म दीक्षाभूमी नागपूर, चैत्यभूमी दादर मुंबई ह्या ठिकाणी येणारे तथागत बुद्ध संत कबीर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज तथा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक अनुयायी मौल्यवान ग्रंथ खरेदी करून ते स्वतःवर संस्कार करून घेण्यासाठी ते ग्रंथ घरी जाताना डोक्यावर ग्रंथ घेऊन जातात ते डोक्यात घेण्यासाठी असे उद्गार येथील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तथा व्याख्या त्या प्रा.जयश्री खरे यांनी काढले.

ऐतिहासिक धर्मांतर घोषणेच्या ८९ व्या वर्धापन दिनाच्या उच्च साधून त्यांनी येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मुक्ती भूमी सार्वजनिक वाचनालय तथा राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक मुक्ती भूमी अभ्यासिका यास मौल्यवान ग्रंथ साहित्य दान केले त्यावेळी त्या बोलत होत्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुक्ती भूमी सार्वजनिक वाचनालय तथा मुक्ती भूमी अभ्यासिकेचे संस्थापक शरद शेजवळ यांनी केले. या वेळेला येवला मर्चंट बँकेचे संचालक सुभाष गांगुर्डे मुक्ती प्रतिष्ठानचे सदस्य गुड्डू भाऊ जावळे मंगेश शिंदे वाय डी लोखंडे श्याम पगारे सुनील निकाळे सुप्रसिद्ध कवी गायक सुनील खरे विमलबाई शेजवळ डॉदीक्षा शेजवळ वर्षा शेजवळ गायक जितेंद्र शेजाळ गायिका दीक्षा गौरी विजय भोंडगे सिद्धार्थ गुंजाळ राहुल सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार दतू वाघ यांनी मानले

# पडघा आठवडा बाजारात 'बंध' खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी, मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील आठवडा बाजार म्हणून ओळखला जाणारा पडघा आठवडा बाजारात 'बंध' व्यावसायिकांना वाढत्या महागाईचा फटका जाणवला असून 'बंध' (बांबूपासून तयार केलेला दोर ) विक्रीसाठी आलेल्या आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर नाराजी दिसून आली.

भिवंडी तालुक्यातील पडघा हा अनेक खेड्या गावांचा केंद्रबिंदु मानला जातो. ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय शेती म्हणून आढळून येतो. ३ ते ४ महिन्याच्या कालावधीत धान्य पिकवला जातो. शेतीच नुकतच पिक आल असून लवकरच भात कापणीला सुरुवात होणार आहे. त्याच भाताचे भारे बांधण्यासाठी ग्रामीण भागात बाबुं पासुन बनविलेल्या बंधचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. बांबु ओला असतांना त्याला ठेचून ४ ते ५ दिवस सुकवून 'बंध' बाजारात विकायला आणला जातो. दोरीपेक्षा हे बंद मजबुत व स्वस्त असल्याने भात कापणीच्या दिवसात त्यांना शेतकऱ्यांकडून चांगली मागणी असल्याने भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील आदिवासी बांधव हे 'बंध' बाजारपेठेत विक्रीसाठी आणतात. ऑक्टोबर महिन्यात शेवटचे दोन आठवडे म्हणजे दोनच रविवार 'विक्री 'मधुन आदिवासींना रोजगार मिळतो. मात्र, त्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते. या कामात संपूर्ण कुटुंब गुंतलेले असते.



पडघा आठवडा बाजारात नुकतेच बंध विक्रीसाठी आले असून पडघा परिसरातील शेतकऱ्यांनी 'बंध' खरेदीसाठी गर्दी केली होती. यावेळी पाच्छापूर,उबरखांड, नेवाडा, खातीवली, दहागाव, सारमाल, डोहोळे,पडघा तर आदी ठिकाणाहुन आदिवासी महिला व पुरुष 'बंध' विक्रीसाठी आले होते. महागाईत वाढ झाल्याने दरवर्षी १५० ते २०० रुपये शेकडा असलेले बंध या वर्षी २५० रुपये शेकड्याने विकले जात आहेत. 'बंध' २००ते २५० रुपये शेकडा असून एक 'बंध' प्रत्येकी अडीच रुपयाला पडतो. प्रत्येक एक व्यक्ती २५०० ते ३००० रुपये कमवितो. या विक्रीतून साधारण दोन ते तीन हजार रुपये मिळतात. त्यावर कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो असे 'बंध' विक्रीते यांनी बोलतांना सांगितले. रोजचा खर्च सुटेल या आशेवर आदिवासी बांधव शेती बरोबरच वर्षांतून एकदाच आणि ७ ते ८ दिवसाचा हा व्यवसाय करतात. दरवर्षी प्रमाणे बंधची चांगली विक्री झाली नाही म्हणून बंध विक्री करणाऱ्या आदिवासी बांधवाच्या चेहऱ्यावर नाराजी दिसून आली.

# साड्या नको आम्हाला विकास हवाय विकास; दत्तात्रय भरणेंविरोधात महिलांचा आक्रोश, साड्या रस्त्यावर फेकल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : साड्या नको लाईट द्या, साड्या नको रस्ता द्या, साड्या नको चांगले शिक्षण द्या...आम्हाला विकास हवाय साड्या नको असं म्हणत इंदापूर तालुक्यातील कळंब येथे घोडके वस्ती प्रभाग क्रमांक ३ येथील महीलांनी निषेध व्यक्त केला. साड्या देऊन आमची मते विकत घेता का? असा सवाल महिलांनी विचारला आहे.



विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर इंदापूरमध्ये आमदार दत्तात्रय भरणे यांचा फोटो असलेल्या पिशव्यामधून तालुक्यांमध्ये साड्यांचे वाटप करण्यात आले होते. इंदापूर तालुक्यातील कळंब या गावातील घोडके वस्तीवरील प्रभाग क्रमांक ३ येथील महिलांनी साड्या रस्त्यावरती फेकून दिल्या. आम्हाला विकास हवाय साड्या नको असं म्हणत निषेध व्यक्त केला. तसेच साड्या देऊन आमची मते विकत घेता का? असा सवाल महिलांनी विचारला आहे.

## शिक्षकांचे फुलांच्या पायघड्या आणि फुलांची उधळण करत स्वागत

## सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद लुटला

# २५ वर्षानंतर पुन्हा अनुभवले शालेय जीवनातील स्नेहाचे असे दृढ ऋणानुबंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : पुणे महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन क्र. ५ बोपोडी येथील विद्यालयातील तब्बल २५ वर्षांनी शिक्षक दिन विशेष अश्या सप्टेंबर महिन्याचे औचित्य साधून, १९९९ सालच्या सातवीला असलेले माजी विद्यार्थी आणि त्यांचे गुरुजन वर्ग, सेवकवर्ग यांचा रौप्य महोत्सवी स्नेहमेळावा साधना तांबेपाटील आणि अमित दीक्षित यांच्या संकल्पनेतून आणि सर्व वर्ग मित्रांच्या सहकार्याने एक महिन्याच्या आत सर्वांशी संपर्क करून कामिनी बँक्वेट, पिंपळे सौदागर येथे भव्य आणि दिमाखदारपणे कार्यक्रम संपन्न झाला, हे सर्व पाहून गुरुजनांस सुखद अनुभव मिळाला.

सर्व गुरुजन तसेच माजी विद्यार्थ्यांना फेटे बांधले. शिक्षकांचे फुलांच्या पायघड्या आणि फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आले सर्व विद्यार्थिनींनी शिक्षकांचे औक्षण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विराजमान असलेले सर्व गुरुजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, आशिर्वाद आणि आयुष्यभर पुरेल अशी पुरून उरणारी संस्काराची शिदोरी दिलेली आहे.

सर्व शिक्षकांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती देवी पूजन करण्यात आले. शिक्षक आणि विद्यार्थिनींने सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केले. तद्नंतर, ओंकार स्वरूपा या गीताने सुरेल सुरवात झाली. स्नेहमेळाव्यात शिक्षकांनी शालेय जीवनातील आठवणी, गमतीजमती सांगून मनोगत व्यक्त केले. शाळा जरी संपली असली तरी शिक्षकांच्या संस्काराची शिदोरीने विद्यार्थ्यांची ओंजळ पुन्हा एकदा भरत होती. सर्व माजी विद्यार्थ्यांनी यशाची उत्तुंग शिखरे गाठली आहेत. कुणी उच्चपदावर कार्यरत आहे तर कुणी यशस्वी व्यावसायिक आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. कि. पा. चौधरी सर, श्री. द. ल. लोखंडे सर, श्री. वायाळ सर, श्री शिंपी सर, श्री. फिरोदिया सर, श्रीमती जयश्री लेंभे मॅडम, श्री नरेंद्र पाटील सर, श्रीमती फसले मावशी हे उपस्थित होते.

आज पुन्हा नव्याने भरली होती माझी शाळा

मनात होता तोच आदर आणि होता सोबतीस काळा फळा

बरसुनी गेल्या आजही चेहऱ्यावर त्याच कुतुहलाच्या सरी

घेण्यात आली जेव्हा शाळेतील तिचं पटावरील हजेरी – साधना तांबे

२५ वर्षांनी सर्वांची भेट झाल्यावर शिक्षक आणि विद्यार्थी यांनी आपले मनोगत आणि कवितेतून सतत चार वर्ष अनुभवलेली शाळा, मित्रता शाळेतील गमती जमती, मिळालेले ज्ञान, संस्कार, शालेय परिसर हे सर्व आठवूण जुन्या आठवणींना उजाळा देत असताना सारेजण भावूक झाले होते. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपापल्या कर्तव्याच्या कार्यबाहूल्यावर कायमच शिक्षकांनी दिलेले धडे व संस्कार हेच लक्षात ठेवू अन् नाविन्याचा ध्यास ठेवत उत्तरदायित्वाप्रती खूणगाठ बांधली.




पुन्हा एकदा सर्व शिक्षक आणि मा.लेंभे मॅडम यांनी त्यांच्या दमदार शैलीत पुढच्या पिढीची नावे हे कशी अर्थपूर्ण हवीत हा संस्कृतीचा, संस्काराचा ठेवा आपल्याला जपायलाच पाहिजे. आपण देशाचे आणि समाजाचे देणे लागतो आपण सुजाण नागरिक होणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे हे सांगितले.

सर्व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांना कृतज्ञता म्हणून फुल ना फुलाची पाकळी असे भेटवस्तू स्वरूपात चांदीचे गणपती बाप्पा, फुलांची रोपे, मिल्टन बॉटल्स इ. देण्यात आले आणि परितोष कोल्हे या विद्यार्थ्याच्या वतीने डिनर सेट तसेच रुपेश महाडिक आणि समाधान कांबळे यांच्या वतीने भारताचे संविधान हे पुस्तक सप्रेम भेट देण्यात आले. कार्यक्रमाच्या खर्चाची उरलेली रक्कम अनाथ आश्रमास दान करण्याचा निर्णय घेऊन मानवतेचे दर्शन घडवून एक नवीन आदर्श माजी विद्यार्थ्यांनी जगासमोर ठेवला आहे.

सर्व गुरुजनांनी भविष्यात सर्व माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात सदैव यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा देऊन अध्यक्षीय समारोप केला.

हर्ष उल्हासित असा दिमाखदार सोहळा यशस्वी करण्यासाठी रुपेश महाडिक, राजू कोरे, निलेश शिरसाट, अमित दीक्षित, समाधान कांबळे, साधना तांबेपाटील यांनी आपला बहुमूल्य वेळ देऊन कार्यक्रम यशस्वी होण्यास परिश्रम घेतले.

आभार प्रदर्शन झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता ही ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने करून तद्नंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद लुटला.